# SARASWATI
The Research Journal

(11) Dr. Shivaji Diwan (Pol. Sci.)

Special Issue
Global and Internal Politics: Issues and Areas

**SBES College of Arts and Commerce,**
**Aurangabad, Maharashtra**

Special Issue (1) 2020-21, ISSN 2229 - 5224

**Saraswati**
**The Research Journal**

**Special Issue**
Internal and Global Politics : Issues and Areas

**Editorial Board**
Prof. M.A. Paithankar
In-charge Principal
Prof. M.M. Gaikwad
Vice-Principal
Dr. P.P. Deo
Vice-Principal

**Executive Editor of this issue**
Prof. N.B. Aghav
Head, Department of Political Science

**Please Note**

- The views expressed in this publication are purely personal judgments of the contributors and do not reflect the views of SBES College of Arts and Commerce, Aurangabad, Maharashtra or the editorial board of the research journal.
- No part of this publication may be reproduced or copied in any form by any means without prior written permission.
- 

ISSN 2229 – 5224

© All rights reserved

Email feedback to sbescollegeac@yahoo.com

Published and Typesetting
SBES College of Arts and Commerce, Aurangabad, Maharashtra Printed

# Internal and Global Politics : Issues and Areas

**Special Issue Editor**
**Dr. Navnath Aghav**
Professor and Head
Department of Political Science

**SBES College of Arts and Commerce,**
**Aurangabad, Maharashtra**

| | | | |
|---|---|---|---|
| 25. | भारतीय लोकशाहीच्या बळकटीकरणात निवडणुक आयोगाची भूमीका | डॉ.रामदास निहाळ | 100 |
| 26. | केंद्र व घटक राज्य यांच्यातील प्रशासकीय आणि आर्थिक सबंध | प्रा.जोगदंड बळीराम | 105 |
| 27. | भारतातील प्रादेशिक पक्ष व समकालीन राजकारण | डॉ.ए.पी.वनारसे | 109 |
| 28. | कलम ३५६ आणि राज्यपालाची वादग्रस्त भूमिका | डॉ.राजेंद्र शिंदे | 118 |
| 29. | Regional Political Parties and Contemporary Politics | डॉ.नितीन आहेर | 124 |
| 30. | नागरिकत्व सुधारणा कायदा 2019 | डॉ.चौधरी के.पी.<br>डॉ.तांदळे डी.आर. | 132 |
| 31. | भारतातील केंद्र - राज्य संबंधाचे स्वरुप व तरतुदी | डॉ.नामानंद साठे | 139 |
| 32. | भारतीय राजकारणातील केंद्र-राज्य संबंध एक अभ्यास | डॉ.महादेव मुंडे | 144 |
| 33. | कोरोना, सरकार आणि न्यायालयाची सक्रियता | डॉ.प्रभाकर जाधव | 151 |
| 34. | नागरिकत्व सुधारणा कायद्याचे राजकीयीकरण | प्रा.एकनाथ खरात | 156 |
| 35. | Covid-19 चे सामाजिक,आर्थिक व राजकीय जीवनावरील परिणाम | डॉ.अंबादास बिराजदार | 163 |
| 36. | प्रमुख आणि प्रादेशिक शक्तींशी भारताचा संबंध | डॉ.महेश मोटे | 167 |
| 37. | केंद्र-राज्य संबंध | डॉ.व्यंकटेश खरात | 173 |
| 38. | भारतीय नागरीकत्व कायदा | छाया सवडतकर | 176 |
| 39. | नागरिकत्व दुरुस्ती कायदा | डॉ.जगदीश देशमुख | 180 |
| 40. | 1989 नंतर राज्यपालपद आणि कलम 356 च्या वापराचा केंद्र-राज्य संबंधावरील प्रभाव | डॉ.ढोबळे डी.बी. | 185 |
| 41. | घटकराज्य कारभारात राज्यपालांची भूमीका | डॉ.गालफाडे ए.बी. | 194 |
| 42. | न्यायालयीन सक्रियता | डॉ.शिवाजी दिवाण | 199 |
| 43. | भारतीय राजकारणाचे बदलते स्वरूप आणि निवडणूक आयोग | विलास टाले | 205 |
| 44. | कोरोनी काळातील वाढती न्यायालयीन सक्रियता | डॉ.सुपेकर वैशाली | 211 |
| 45. | भारतीय मतदारांच्या वर्तनावरील प्रभाव | डॉ.निलेश शेरे | 214 |
| 46. | राज्यपालाची भूमिका | संदीप चौधरी | 219 |
| 47. | न्यायालयीन सक्रियता | प्रा.साईचरण पेंडकर | 226 |
| 48. | न्यायालयीन सक्रियतेचा विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ.मलदोडे रामराव | 229 |
| 49. | Covid 19 and Global political Economy | R. V. Mhaske | 234 |
| 50. | निवडणुक आयोगाची भूमिका | उज़मा ऐनोद्दीन सिद्दीकी | 237 |
| 51. | केंद्र आणि राज्य संबंध | ज्योती दराडे | 241 |

# न्यायालयीन सक्रियता

डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण

**प्रस्तावना :**

भारतात न्यायालयीन क्रियाशीलता म्हणजे सक्रियेतचा विकास गेल्या वीस-पंचवीस वर्षापासून होताना दिसत आहे. भारताने लोकशाही शासनव्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. त्यामुळे लोकांच्या हितसंवर्धनाचा विचार करणे अपरिहार्य ठरते. भारतात सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाल्यापासून न्यायालयीन सक्रियेतला प्रारंभ झाला आहे.

भारतीय राज्यघटनेचा अनुच्छेद 124 नुसार सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यघटनेतील तरतूदीनुसार सर्वोच्च न्यायालयाला कायदा, अपिल तसेच राज्यघटनेचा अर्थ लावण्याचा महत्त्वाचा अधिकार प्राप्त झाला आहे, शिवाय त्याला न्यायालयीन पुनर्विलोकनाचाही अधिकार असल्याचे त्यात नमूद करण्यात आले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय घटना बनवितानाच कायदेमंडळ हे लोकप्रतिनिधींचे असेल आणि ते जनतेसाठी योग्य कायदे करेल. तसेच कायदेमंडळाने केलेल्या कायद्याप्रमाणे कार्यकारी मंडळ प्रशासन करेल आणि कायद्याच्या संरक्षणासाठी कार्यकारी मंडळ प्रशासन करेल आणि कायद्याच्या संरक्षणासाठी व त्यांच्या अंमलबजावणीसाठी न्यायमंडळ असेल अशी भारतीय शासनव्यवस्थेची रचना करुन, भारतीय लोकशाहीची घडी व्यवस्थित बसविल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतीय शासनव्यवस्था ही प्रामुख्याने कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या प्रमुख तीन घटकात विभागलेली आहे.

लोकशाहीत लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी कायदे करावेत आणि त्यानुसार प्रशासन चालावे हे अपेक्षित असते. मात्र जेव्हा हेच कायदेमंडळ कुठे चुकत असेल आणि त्यामुळे एकूणच घटनात्मक चौकटीचा भंग होत असेल, तेव्हा मात्र ती जबाबदारी सांभाळण्याचे कार्य न्यायसंस्थेला करावे लागते. बहुधा सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी स्वतंत्र निर्भीड आणि नि:पक्षपातीपणे आपली मते नोंदवून भारतीय घटनेचा आणि स्वत:चा सन्मान टिकवून ठेवल्याचे निदर्शनास येते.

न्यायमंडळ हे शासनव्यव्सथेचे महत्त्वपूर्ण अंग आहे. कायद्यानुसार निर्णय घेणे, कायद्याचा अर्थ लावणे व न्यायदान करणे हे न्यायालयाचे महत्त्वाचे कार्य आहे. यानुसार भारतीय न्यायपालिका कार्य करीत होती. सन 1970 नंतर न्यायपालिकेने भारतीय लोकभावनांचा विचार करुन आपली कृतीशीलता दाखवली म्हणून न्यायालयीन सक्रियता हे भारतीय न्यायव्यवस्थेचे एक प्रमुख वैशिष्टय व लक्षण झालेले आहे.

साधारणत: 1980 च्या दशकात न्यायालयीन सक्रियतेचा उदय झाला. कालांतरान ही संकल्पना विकसित होत गेली. आज न्यायालयीन सक्रियता ही भारतीय राजकीय व्यवस्था,

भारतीय राज्यघटना व भारतीय न्यायव्यवस्थेचे एक प्रमुख वैशिष्टय झालेले आहे. न्यायालयीन सक्रियतेचा प्रांरभ प्रथम सर्वोच्च न्यायालयापासून झाला. त्यानंतर उच्च न्यायालय,जिल्हा न्यायालयांनी त्यांचा स्विकार केला.

आज भारताच्या सर्वोच्च न्यायालयापासून ते तालुकास्तरीय न्यायालयापर्यंत सर्व न्यायालयांनी सक्रियता दाखवण्यास सुरुवात केलेली आहे.

**शोध निबंधाची उदिदष्टे :**

1) न्यायालयीन सक्रियेतचा अर्थ समजून घेणे.
2) न्यायालयीन सक्रियतेचे स्वरुप जाणून घेणे व प्रकाश टाकणे.
3) न्यायालयीन सक्रियतेच्या दृष्टीकोनातून न्यायालयाने घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेणे.
4) न्यायालयीन सक्रियता व भारतीय न्यायव्यवस्थेतील संबंध अभ्यासणे.

**न्यायालयीन सक्रियेतचा अर्थ :**

(Meaning of Judicial Activism)

न्यायालयाने घटना व कायद्याच्या चौकटीत राहून कार्य केले पाहिजे अशी परंपरागत धारणा आहे. परंतु या पलिकडे जाऊन सामाजिक, राजकीय, आर्थिक व इतर परिस्थिती लक्षात घेऊन न्यायनिवाडा सर्वोच्च न्यायालय करीत आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून अपेक्षित नसणारी सामाजिक हिताची व जनहितासाठी न्यायपालिका काम करते व जनहितासाठी जेव्हा आदेश देते तेव्हा त्यास न्यायालयीन सक्रियता असे म्हणतात.

**न्यायालयीन सक्रियेतचे स्वरुप :**

(Nature of Judicial Activism)

1) जनहितासाठी शासनास आदेश देणे.
2) समाजहितास बाधक कायदा रद्य करणे.
3) प्रशासनातील अधिकाऱ्यास समाजहितासाठी कामे करण्यास भाग पाडणे.
4) कायद्याच्या न्यायाव्यतिरिक्त सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायास महत्त्व देणे.
5) भारतातील सामान्य जनतेच्या राहणीमान सुधारणा व्हावी यासाठी सक्रिय होणे.
6) सामाजिक न्यायासाठी कायदेमंडळास विशिष्ट कायदा करण्याची सूचना देणे.
7) न्यायालयाने स्वत: पुढाकार घेऊन शासनास आदेश देणे.
8) जनहित याचिकांना मान्यता देणे व त्यावर निर्णय देणे.
9) शासनाच्या म्हणजेच कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणे.

**भारतातील न्यायालयीन सक्रियतेचा विकास :**

1980 मध्ये घडलेला आग्रा सुरक्षा गृह खटला हे न्यायालयीन सक्रियतेचे महत्त्वपूर्ण उदाहरण मानावे लागेल. आग्रा येथील सुरक्षा गृहातील गैरसोयी आणि अमानवी व्यवस्थेबददल कायद्याच्या दोन प्राध्यापकांनी इंडियन एक्सप्रेस वृत्तपत्राला पत्राव्दारे माहिती कळविली त्याच वर्षी दिल्ली येथील महिला गृहातील परिस्थिती बददल दिल्ली विधीशाखेच्या एका विद्यार्थ्याने अर्ज दाखल केला तर तीन पत्रकारांनी स्त्रियांचा बाजार उघडीस आणून आत्याचारित स्त्रियांना नुकसान भरपाई द्यावी आणि त्यांचे पुनर्वसन करण्याची मागणी केली.

न्यायालयाने अशाप्रकारे पोलिस कोठडीत होणाऱ्या मृत्यू हुंडयाच्या कारणावरुन होणारे खून, पोलीस स्टेशनमधील बलात्कार इत्यादी घटनांची दखल घेण्यास सुरुवात केली. पुढे 1993 या एकाच वर्षात आपल्या महत्तवपूर्ण निर्णयात श्रीनगर येथील हजरतबल दर्ग्यातील निष्पाप व्यक्तिचे हक्कांचे संरक्षण करण्याचा मुख्य निवडणूक आयुक्तंच्या अधिकाराचे समर्थन करणारा गंगानदी आणि ताजमहालास प्रदूषणामुळे धोका पोचवणाऱ्या प्रदूषित कारखाने बंद करण्याचा निर्णय इ.महत्त्वपूर्ण निर्णय दिले.

हवाला खटल्यामध्ये तर न्यायालयाने कार्यकारी शाखेला आपले काम कसे करावे या विषयीचे आदेश दिले. या खटल्यात CBI प्रमुखांना खटल्याचा दैनंदिन घडामोडी विषयी सविस्तर माहिती कळविण्याचे आदेश न्यायालयाने दिले. 1996 मध्ये 500 करोडच्या पशुखाद्य घोटाळयाची चौकशी करण्यासाठी या शाखेला हिरवा कंदिल दाखविण्याचा आदेश ही न्यायालयाने दिला.

देशातील राजकारणाला लागलेली गुन्हेगारीची कीड पूर्णपणे संपुष्टात आणण्याच्या हेतूने सर्वोच्च न्यायालयाने 10 जुलै 2013 रोजी दिलेला निकाल न्यायालयीन सक्रियतेच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा मानता येईल. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार गुन्हेगार खटल्यात शिक्षा झाल्यास यापुढे लोकप्रतिनिधीचे सदस्यत्व आपोआप रदद होईल. एवढेच नव्हे तर पोलीस कोठडीत किंवा तुरुंगात असलेल्या व्यक्तींना निवडणूक लढवता येणार नाही, असे आणखी एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

दि.06 जुलै 2013 रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल न्यायालयीन सक्रियेतला हातभार लावणारा दिसून येतो. मतदारांना आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्षांकडून त्यांच्या निवडणूक जाहिरनाम्यामध्ये दिल्या जाणाऱ्या भेटवस्तूंच्या आश्वासनामुळे मुक्त व स्वतंत्र वातावरणात निवडणूका घेण्याच्या कल्पनेच्या मुळावरच आघात होतो. असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यातील मजकुराचे नियमन करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगास दिले.

सर्वोच्च न्यायालयाने दि.8/10/2013 रोजी एक महत्त्वाचा निर्णय देऊन सामाजिक कार्यात सर्वोच्च न्यायालयाने सक्रीय असल्याचे दाखवून दिले आहे. या आदेशात सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि सर्व राज्य सरकारांना अपंगासाठी 3 टक्के आरक्षण देण्याचे निर्देश दिले.

माहितीच्या अधिकाराच्या संदर्भात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. 1981 मध्ये मनुभाई शाह विरुध्द लाईफ इन्शुरंन्स कार्पोरेशन या खटल्यामध्ये माहित करुन घेण्याचा अधिकार कलम 19 मध्ये अंतर्भूत आहे. नव्हे ती पूर्वअट आहे असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला होता.

याशिवाय एस.पी.गुप्ता आणि इतर विरुध्द भारत सरकार खटला 1982 मध्ये निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, गुप्तता ही भ्रष्टाचारास व सत्तेच्या दुरुपयोगास चालना देते. लोकांना माहिती दिली गेली तर लोकांना चांगले व कार्यक्षम प्रशासन मिळण्यास मदत होईल.

माहितीच्या अधिकारास या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे चालना मिळाली. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा भारताच्या सर्वोच्च् न्यायालयाच्या सक्रियतेचा परिणाम आहे. मतदारांना नकाराधिकार वापरण्याचा अधिकार नुकताच सर्वोच्च् न्यायालयाने बहाल केला आहे. मतदान यंत्रावर नकाराधिकार वापरण्याची सोय उपलब्ध करुन देण्याचा निवडणूक आयोगाला आदेश न्यायालयाने दिला आहे. आजच्या राजकीय व्यवस्थेवर नाखूश असलेली सिव्हील सोसायटी, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय विचारक यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे समर्थन करुन न्यायालयीन सक्रियतेचे समर्थन केले आहे.

सन 1990 नंतरच्या काळातील सर्वोच्च न्यायालयाच्या काही निर्णायवरुन भारतीय शासनव्यवस्थेत न्यायालयाने सक्रियतेची भूमिका स्वीकारली असल्याचे दिसून येते. उदा.क्रिमलेअर ही संकल्पना विकसित करुन सर्वोच्च न्यायालयाने मागासवर्गीय जातीमधील खरोखर गरजू व्यक्तींना आरक्षणाचे लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला. 13 ऑगस्ट 1990 रोजीची मागासवर्गीयासाठी 26% आरक्षणाची तरतूद असणारा राष्ट्रपतीचा अध्यादेश सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरविला.

मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यावरुन निर्माण झालेली राजकीय कटूता थांबविण्याच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय महत्त्वपूर्ण ठरला. वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये कॅपिटेशन फी च्या आधारे प्रवेश देण्यास प्रतिबंध करुन सर्वोच्च न्यायालयाने सामाजिक विकृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला. प्रदूषण नियंत्रणासाठी ताजमहलाच्या परिसरातील लघु उद्योग, 15 वर्ष जुन्या चार चाकी वाहनांचे परवाने बंद करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

प्रधानमंत्र्याच्या नियंत्रणाखाली सी.बी.आय. (केंद्रीय जॉच ब्युरो) चे कामकाज सुरु असते. जैन हवालाकांड खटल्याची सुनावणी सुरु असताना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाशिवाय जैन हवालाकांड चौकशीमध्ये अन्य कोणतेही व कोणाचेही आदेश पालन न करण्याची सर्वोच्च न्यायालयाने सी.बी.आय.ला सक्त ताकीद दिली. पंतप्रधानाच्या सरळ नियंत्रणाखाली कार्य

करणाऱ्या सी.बी.आय.ला केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे पालन करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने प्रथमच दिला

न्यायालयीन सक्रियता हे भारतीय राजकीय व्यवस्था भारतीय राज्यघटना व भारतीय न्यायव्यवस्थेचे एक प्रमुख वैशिष्टय बनले आहे. न्यायालयीन सक्रियतेअंतर्गत न्यायायालय जनहितासाठी शासन, कायदेमंडळ व प्रशासनास आदेश देते. भारतीय संसदेनेही न्यायालयीन सक्रियतेचा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर राखून अनेक घटना दुरुस्त्याही केलेल्या आहेत. उदा.24 व 86 वी घटनादुरुस्ती वय वर्षे 6 त 14 वर्षाखालील मुलांना मोफत प्राथमिक शिक्षण माहिती अधिकार कायद्याचा विकास, मतदारांना नकाराधिकारचा अधिकार, दोषी उमेदवारांचे सदस्यत्व रद्द करण्यासंदर्भात अलीकडे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयीन सक्रियतेच्या संदर्भात महत्त्वाचे निर्णय दिलेले आहेत.

**निष्कर्ष :**

1) न्यायालयीन सक्रियतेमुळे संघराज्य पध्दती सुदृढ होण्यास मदत होत आहे.
2) नागरिकांना संविधानाने दिलेल्या मुलभूत हक्कांवर कोणीही गदा आणू शकत नाही.
3) न्यायालयीन सक्रियतेमुळे शासनाला आपल्या मनाप्रमाणे कार्य करता येत नाही.
4) या प्रक्रियेमुळे लोकप्रतिनिधी जनतेला जबाबदार राहतात.
5) सर्वोच्च न्यायालयाच्या कृतिप्रवणतेमुळे संविधानाचे संरक्षण होते.
6) न्यायालयीन सक्रियतेच्या वाढीमुळे न्याय प्रस्थापित होण्यास मदत होते.
7) न्यायालयीन सक्रियतेमुळे भ्रष्टाचारास आळा बसू शकेल.
8) न्यायदान प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होते.
9) सार्वजनिक हिताच्या दाव्यांवर निर्णय होऊन सार्वजनिक हितसंवर्धन होते.
10) मूलभूत अधिकारांना तात्काळ संरक्षण देण्यात येते.
11) न्यायदानाच्या क्षेत्रात चांगल्या प्रथा पडण्यास मदत होते.

**समारोप :**

भारताने स्वीकारलेली संविधान पध्दती इंग्लड अमेरिकेच्या धर्तीवर आधारित आहे. भारतीय संविधानाने सांसदीय लोकशाही व्यवस्थेचा स्विकार करुन कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या तिनही विभागांना स्वायत्तता आणि स्वातंत्र्य देण्यात आली आहेत. कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ या दोन्ही संस्था आपल्या मर्यादांचे उल्लंघन करतात काय हे पाहण्याचे कार्य न्यायमंडळाला करावे लागते.

तसेच संविधानातील नियमानुसार त्यांचे कार्य चालले आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी संविधानाने न्यायालयावर टाकलेली आहे. मंडल आयोगाच्या शिफारशी अंमलात आणण्याच्या संदर्भात वृतपत्र स्वातंत्र्य व भाषण स्वातंत्र्य नष्ट करण्याच्या संसदेच्या अधिकारा संदर्भात तसेच लोकप्रतिनिधींच्या गुन्हेगारी प्रवृत्तीबददल काढलेल्या अध्यादेशासंबंधी न्यायालयाने

घेतलेल्या निर्णयावरुन न्यायालयाची सक्रियता लक्षात येते. त्यासोबतच आर्थिक घोटाळे, स्त्रियांवरील अत्याचार, भ्रष्टाचार, आरोग्य, शिक्षण, मुलभूत अधिकार अशा अनेक प्रश्नासंबंधी न्यायालयीन सक्रीयतेमुळे जनतेला प्रत्येक क्षणी न्याय मिळालेला आहे. त्यामुळेच लोकशाही प्रकीयेला मजबूत करता आले.

जनहितासाठी न्यायालयाने उचललेले पाऊल अत्यंत महत्त्वपूर्ण आहे अशी भावना जनमानसात निर्माण होवू लागली आणि न्यायलयीन सक्रियेतेला गती मिळाली.

**संदर्भ :**


1) भारताचे शासन आणि राजकारण,पिंपळपुरे आणि कं.पब्लीशर्स,तिसरी आवृत्ती, नागपूर 2008 (भोळे भा.ल.)
2) भारतीय संविधान व राजकारण आणि कायदा, पिअरसन पब्लिकेशन,दिल्ली 2013 (जोशी स्मिता)
3) न्यायपालिका कसौटी वर -कमलेश जैन
4) भारत नै न्याय प्रशासन-डॉ.बेला भनोत
5) भारताचे संविधान,अथर्व पब्लिकेशन्स जळगाव-डॉ.शुभांगी राठी
6) भारतीय संविधान-शासन व राजकारण, बी.वाय.कुलकर्णी, एज्युकेशनल पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स औरंगाबाद.
7) निवडणुकीचा कायदा, न्या.नरेंद्र चपळगावकर,साहित्य सेना प्रकाशन औरंगाबाद 1994
8) भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण-डॉ.भा.ल.भोले नागपूर
9) भारतीय राजकीय व्यवस्था-प्रा.चिं.ग.धांगरेकर
10) भारताचे शासन आणि राजकारण-डॉ.रा.ज.लोटे
11) भारतीय शासन आणि राजकारण-श्री.साईनाथ प्रकाशन नागपूर-डॉ.अलका देशमुख
12) चाणक्य मंडळ-डिसेंबर 2013


***